महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,मंत्रालय
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ३२.
Email:-dofa.wrd@maharashtra.gov.in
दूरध्वनी क्र. ०२२-२२७९३०५५ /२२७९ ३३८१

---

जा.क्र.संकीर्ण २०२२/( प्र.क्र. ६२ /२०२२)/आ.(क्षेप्र) दि.०५ /०४/२०२२

प्रति,
सर्व महासंचालक,
सर्व कार्यकारी संचालक,
जलसंपदा विभागाच्या अधिनस्त सर्व मुख्य अभियंता
जलसंपदा विभागाच्या अधिनस्त सर्व परिमंडळीय अधीक्षक अभियंता

विषय:- महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक ) नियम १९७९ अनुसार शासन मान्यताप्रापत घटना तसेच नियोजित संघटनेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत.
संदर्भ:- सामान्य प्रशासन विभागाचे क्र.संघटना१५२२/ प्र.क्र.५६/का.१६-अ, दि १५ मार्च २०२२रोजीचे पत्र

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, संदर्भात नमूद केलेल्या शासन पत्र www.maharashtra.gov.in येथील शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून ते आपण संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावे व त्याचे कृपया अवलोकन करावे.

२. उक्त पत्रान्वये असे कळविण्यात आले आहे की शासकीय कर्म चारी (औद्योगिकेतर) यांच्या संघटनांना महाराष्ट्र नागरी (सेवा) वर्तणूक नियक, १९७९ च्या नियम २९, नियम ३० व सदर नियमावलीच्या परिशिष्ट, अनुसूची एक व अनुसूची दोन मध्ये विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच "नवीन आदर्श नियम" ची घटना व नियमांच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येते. अशा मान्यता देताना मंत्रालयीन् प्रशासकीय विभागांनी कार्यरत शासन मान्य संघटना तसेच प्रस्तावित संघटनांच्या बाबतीत करावयाची कार्यवाही ९ मुद्यांमध्ये अ.क्र. १ ते ९ प्रमाणे विशद करण्यात आली आहे.

३. या अनुषंगाने आपणांस आपल्या अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये कार्यरत असणाऱ्या संघटनांविषयीची खालीलप्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत :-

(१) संदर्भाधीन शासनपत्रातील अ.क्र. १, २ व ३ शी संबंधित असलेली माहिती तात्काळ उपलब्ध करुन घ्यावी व शासनास सादर करावी.

(२) तसेच संदर्भाधीन शासनपत्रात अ.क्र. ४ व ५ अन्वये नमूद केलेल्या मुद्यांनुसार कार्यवाही करणे आवश्यक असल्यास त्यानुषंगाने प्रस्तावाची संबंधित शासन परिपत्रातील तरतूदीनुसार प्रत्येक मुद्यांन्वये संपूर्ण तपासणी करुन उचित अभिप्रायांसह व कागदपत्रांसह आपला प्रस्ताव शासनाकडे दिनांक ३०/०४/२०२२ पर्यंत शासनास सादर करावा.

(३) आपल्या प्रस्तावासोबत / अहवालासोबत जोडलेल्या सर्व संदर्भ कागदपत्रांचे स्पष्टीकरण प्रस्तावामध्ये / अहवालामध्ये देण्यात यावे.

४. सदर माहिती सामान्य प्रशासन विभागास विहित कालमर्यादेत सादर करावयाची असून त्यानुषंगाने वरीलप्रमाणे कार्यवाही पूर्ण करुन आपला अनुपाल अहवाल विहित कालमर्यादेत शासनास सादर करावा. तसेच या प्रकरणी विलंबाने अहवाल / प्रस्ताव सादर केल्यास व त्या अनुषंगाने कोणतेही (न्यायालयीन / लोकायुक्त) प्रकरण उदभवल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहील,याची कृपया नोंद घ्यावी.

1/4/22

( यमुना जाधव )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत:- आ (क्षेप्र) संग्रहार्थ.